शब्दाली प्रकाशन पुणे-५८.

■ एसडीएम/पुणे/एसआर/६१/६/४/२०१३ ■ आयएसएसएन : २२३१-४३७७

SAKSHAM SAMIKSHA त्रैमासिक

# सक्षम समीक्षा

मराठी भाषा-वाङ्मय व संशोधन यासाठी असलेला मंच

■ वर्ष : ८ वे ■ अंक : दुसरा ■ जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर-२०१८

■ संपादक :
प्रा. डॉ. शैलेश विश्वनाथ त्रिभुवन
(एम.ए. एम.फिल. पीएच.डी. - मराठी)

■ प्रकाशक, मालक, मुद्रक : सुनिता शैलेश त्रिभुवन
(एम.ए. - मराठी)

■ पत्र व्यवहारचा पत्ता : शब्दाली प्रकाशन
बी-५/२०६/दुसरा मजला, राहुलनिसर्ग, अतुलनगर,
वारजे-माळवाडी, पुणे - ४११ ०५८.
मो. : ९९२२१ ३०१५७, ७८८८२ ६२३१०
Email : dr.shailesh.tribhuwan@gmail.com

■ टाईपसेटिंग : गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ मुद्रक : गणेश ग्राफिक्स, पुणे.

■ मुखपृष्ठ : संपादक

■ वर्गणी : वार्षिक: व्यक्ती: रु.४००/- संस्था : रु.४५०
पाच वर्षे : व्यक्ती: रु.२,०००/- संस्था: रु.२,२५०

■ लेख पाठवताना : ७०८ श्रीलिपीमध्ये व ओपन फाईलमध्ये पाठवावेत.

■ वार्षिक व पंचवार्षिक वर्गणी :
आपल्या स्थानिक बँकेत -
बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वेनगर, पुणे.
(IFCS Code - MAHB 00 00 970)
'शब्दाली प्रकाशन' पुणे. (खाते क्र. : 60058138435)
या खात्यावर जमा करून सदर पावती वरील प्रकाशनाच्या पत्त्यावर पाठवावी.

■ सल्लागार मंडळ :

डॉ. नागनाथ कोतापल्ले (पुणे) - मो. : ८८८०५७७०८८
डॉ. रावसाहेब कसबे (नाशिक) - मो. : ९८५०५४७५७८
डॉ. यशवंत मनोहर (नागपूर) - मो. : ८००७९५५५७७
डॉ. निशिकांत मिरजकर (पुणे) - मो. : ९९७०१८४५६२
प्रा. दत्ता भगत (मुंबई) - मो. : ९८८१२३००८४
प्रा. उत्तम कांबळे (नाशिक) - मो. : ९८८१०९९१४३
प्रा. डॉ. मनोहर जाधव (पुणे) - मो. : ९८२२८५०२१०
प्रा. मिलिंद जोशी (पुणे) - मो. : ९८५०२७०८२३

■ संपादक मंडळ :

प्रा. डॉ. अनिल सपकाळ (मुंबई) - मो. : ९४२२०७८४१३
प्रा. डॉ. शैलेंद्र लेंडे (नागपूर) - मो. : ८१४९३१२२३४
प्रा. डॉ. सुधाकर शेलार (अ.नगर) - मो. : ९८९०९१३२३६
प्रा. डॉ. सुनिल चंदनशिवे (कोल्हापूर) - मो. : ९९७०१८४५६२
प्रा. डॉ. सारिपुत्र तुपेरे (सोलापूर) - मो. : ९८२२९८४३१३
प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर (नांदेड) - मो. : ७५८८४१२१५३
प्रा. डॉ. तुषार चांदवडकर (नाशिक) - मो. : ९४२२९४३६५२
प्रा. डॉ. प्रमोद पडवळ (वाराणसी) - मो. : ९४५०५३३४६६
प्रा. विनय मडगावकर (गोवा) - मो. : ८३०८४७७६६४
प्रा. डॉ. संजय करंदीकर (गुजरात) - मो. : ९९०९११६९७८
प्रा. डॉ. संजय कांबळे (बेळगाव) - मो. : ९१६४३५८४८९
प्रा. डॉ. सुमेध रणवीर (कलकत्ता) - मो. : ७५८५९५०३६५
प्रा. डॉ. ताहिर पठाण (अलिगड) - मो. : ९९२२०२६६९८

• या अंकातील लेखांतून व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी सल्लागार मंडळ, संपादकीय मंडळ, संपादक, मालक मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

या त्रैमासिकात लेख, शोधनिबंध, कविता छापण्यासाठी कोणतीही रक्कम स्वीकारली जात नाही. परंतु सभासदत्व अनिवार्य

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकाच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले असले, तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशीमंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

# अं|त|रं|ग


१) तौलनिक साहित्य आणि वाङ्मयेतिहास — प्रा. डॉ. निशिकांत मिरजकर (पुणे) ........४

२) आदिवासी संस्कृती — प्रा. डॉ. भौमिक देशमुख (पुणे) ........... १३

३) आदिवासी संस्कृती मधील रूढी परंपरा व नीतिनियम — प्रा. डॉ. संजय घोडेकर (पाबळ) ......... १६

४) आशादायक समाजचित्र उभारणाऱ्या कथा — प्रा. डॉ. कीर्ती मुळीक (पुणे) ........... १८

५) 'मन्हा गावले' बोलीतील काव्यनिर्मितीचा आश्वासक — प्रा. डॉ. योगिता पाटील (धुळे) ......... १९

६) उच्च शिक्षणातील बदलते प्रवाह — प्रा. डॉ. शीला गाढे (कोपरगाव) ......... २३

७) आजच्या मराठी कादंबरीतील सांस्कृतिक पर्यावरण — प्रा. डॉ. महेश खरात (औरंगाबाद).........२४

८) हिंदू-मुस्लीम संस्कृतीतील एकात्मता — प्रा. डॉ. ताहेर एच. पठाण (अलिगड) ....३२

९) संघर्षगाथा एका आईची..... — प्रा. डॉ. राजाराम गावडे (इंदापूर) ........ ३५

१०) वाचकांच्या अंतर्मनाचा वेध घेणारी कादंबरी — प्रा. सुशांत जाधव (कोल्हापूर) ............३७

११) साहित्य आणि समाज (दलित साहित्याच्या संदर्भात) — प्रा. डॉ. विजय केसकर (वालचंदनगर).....३९

१२) १९८० नंतरचे ललित गद्य लेखन — प्रा. डॉ. संभाजी मलगे (तळेगाव) .........४०

१३) दिगंबर पाध्ये यांचे समीक्षा लेखन — प्रा. डॉ. नामदेव गपाटे (वाराणसी).........४२

१४) १९४७ नंतरची ग्रामीण कादंबरी : काही निरीक्षणे — प्रा. डॉ. दया जेठे (अहमदनगर) ..........४८

१५) मातंग संज्ञेचा अर्थ — प्रा. अविनाश तायडे (पुणे) ...............५०

१६) विठो रखुमाय – स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून... — सचिन म्हस्के (मुंबई) .....................५२

१७) चित्रपटातील भाषाशैली — प्रा. संजय मोरे (पुणे) .....................५६

१८) सार्वजनिक ग्रंथालयाची सद्यस्थिती – एक शोध — तृप्ती सुभाष अंब्रे (पुणे) ..................५९

१९) जी.ए.चा 'निळा सावळा' वास्तविकतेचे साद-पडसाद' — प्रा. सुनिता अत्रे (श्रीरामपूर)..................६२

२०) लीळाचरित्र व सूत्रपाठ — वंदना आकाशकर (पुणे) ..................६४

२१) फेसाटी : एका सामान्य स्खलनशील जीवाची कथा — प्रा. प्रबंधिका शेलार (अहमदनगर) ........६९

२२) मराठी नाटक आणि वसंत कानेटकर — डॉ. पी. जी. कुलकर्णी (पुणे) ............७२

२३) साहित्याचे वर्तमानकालीन स्वरूप मांडणारा ग्रंथ — प्रा. तुषार भोसले (पुणे) ..................७४

२४) मनोरंजन व्यापारी : बंगाली साहित्यातला नवचेतनेचा — प्रा. डॉ. सुमेध रणवीर (कलकत्ता) ........७६

२५) प्रवासवर्णन: एक ललित साहित्यप्रकार — सौ. सीमा शेळके – पावडे (सासवड) .....७९

२६) दलित भाषेचे उत्कृष्ट चित्रण करणारे – आत्मकथन — प्रा. वनिता शिंदे (कोल्हापूर) ..............८१

२७) नाथामास्तर घोडेगावकर यांच्या वगनाट्यातील व्यक्तिरेखा — गणेश चौधरी (पुणे) ......................८५

२८) कविता महाजन यांच्या कादंबऱ्या — डॉ. किशोर सानप (अमरावती) ..........९०

२९) भालचंद्र नेमाडे यांचे जातीयतेसंबंधीचे विचार — प्रा. संजय सिंगनजुडे (नागपूर) .............९८

३०) कादंबरीचे चित्रपट माध्यमांतर — डॉ. सौ. जयदेवी पवार (लातूर) ..........१०१


SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

# आदिवासी संस्कृती मधील रूढी परंपरा व नीतिनियम



**प्रा. डॉ. संजय घोडेकर**
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय,
पाबळ ता. शिरुर, जि. पुणे.
मो. ९९७०२०४१६०
dr.sanjayghodekar@gmail.com

**प्रास्ताविक** – आदर्श जीवन जगण्याची पद्धती म्हणजे संस्कृती किंवा संस्कारपूर्ण, संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल-विशिष्ट रीत म्हणजे संस्कृती. अशा संस्कृतीच्या अनेक व्याख्या केल्या जातात. संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतांना तिच्यामध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फरक पडत जातो. कोणतीच संस्कृती ही स्थिर नसते. ती बदलत जाते. या बदलात तिच्यावर चांगला वाईट परिणाम होत असतो. एकतर तिचे संवर्धन होऊन वाढीस लागते किंवा पूर्णतः बदलून जाते. भाषा हा संस्कृतीच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक आहे. भाषेमुळेच संस्कृतीची उत्पत्ती, संवर्धन व संक्रमण होत असते. इरावती कर्वे म्हणतात, "मनुष्यनिर्मित पदार्थमय जग, कल्पनामय जग म्हणजे संस्कृती"[१] प्रत्येक देशाची, प्रत्येक राज्याची वेगळी संस्कृती असते, तशीच प्रत्येक समाजाची एक वेगळी संस्कृती असते. आदिवासी समाजाची एक वेगळी संस्कृती आहे. सर्वांत जुनी, सर्वांची जननी म्हटले, तरीही चालेल. ज्या संस्कृतीमध्ये उच्चनिचता नाही. ज्या संस्कृतीमध्ये सर्वसमावेशकता आहे. ज्या संस्कृतीची पाळेमुळे खोल रोवलेली आहेत. त्यामुळे ती संस्कृती फक्त बेगडी राहत नाही. तर ती एक जबाबदार संस्कृती ठरते. आदिवासी समाज भारतभर अनेक ठिकाणी विखुरलेला आहे. आदिवासीच्या एकूण ४७ जमाती सर्वच एकसारख्याच आहेत, असे होऊ शकत नाही. कारण ज्या भौगोलिक प्रदेशात जी आदिवासी जमात राहते. त्या ठिकाणची गुणवैशिष्ट्ये त्यांच्यामध्ये आपणास पाहावयास मिळतात. उदाहरणार्थ त्यांची जीवन जगण्याची पद्धत त्यांचे राहणीमान त्याची भाषाशैली, त्यांचे अन्न त्यांच्या रूढी परंपरा, नीतिनियम या सर्वच गोष्टींमध्ये थोडीफार विविधता आढळते. त्याचबरोबर काही साम्यस्थळेही त्यांच्यामध्ये आढळतात. डॉ. विनायक तुमराम म्हणतात, "आदिवासींची संस्कृती आनि त्यांचा विकास यांचा सांस्कृतिक आधिष्ठानातच आहे. सत्ता-संपत्तीचे आकर्षण व भ्रष्ट मार्गाने व्यक्तिविकास आदिवासींना गर्तेत लोटील"[२] डॉ. विनायक तुमराम व डॉ. गोविंद गारे यांच्या मतानुसार आदिवासीच्या संदर्भातील हे वास्तव चित्र आपण पाहतो आहोत. आदिवासी मूळ संस्कृती आता बदलत चाललेली दिसते. तिचे जतन, संवर्धन जर आता करता आले नाही, तर नंतर बदलत्या समाजव्यवस्थेबरोबर ते इतके बदलवून जाईल की, आदिवासी संस्कृती म्हणजे नक्की काय? हे ही सांगता येणार नाही. आदिवासी जमातीच्या चालीरिती, रूढीपरंपरा, संस्कृती जतन करणे, संवर्धन करणे, गरजेचे वाटू लागले आहे. आदिवासी संस्कृती, आदिवासी जन्मसंस्कार, आहार, पोशाख, घर, त्यांचे व्यवसाय, उपजिविका, त्यांचे मुख्यअन्न, त्यांच्या घराची रचना, त्यांचे कौटुंबिक जीवन, त्यांच्या चालीरिती, नीतिनियम अंधश्रद्धा, देवदेवता, धर्म, जातपंचायत, लग्नसमारंभ, व तसेच अत्यंसंस्कार, विवाहपद्धती, भाषा, गोटूल, दिनक्रम, नृत्य, वाद्य इ.सर्वच बाबीचा विचार आपण करणार आहोत.

**आदिवासी जन्मसंस्कार**

आदिवासी जमाती काही बाबतीत जरी, सारख्याच असल्या तरी, काही रीतीरिवाज प्रत्येक जमातीमध्ये थोड्याफार फरकाने बदल दिसून येतात. बाळ जन्माला आल्यानंतर इतर समाज ज्या पद्धतीने लहान बाळांची काळजी घेतो. त्याला दवापाणी, औषधे, टॉनिक किंवा मुळात त्या मुलांचा जन्मच दवाखाण्यामध्ये होतो. परंतु आदिवासीमध्ये मुलांचा जन्म दवाखाण्यात वगैरे होत नाही. मुलाचा जन्म घरीच होतो. आदिवासी मुलांच्या जन्म संस्काराबाबत प्रत्येक जमातीत थोड्याफार प्रमाणात फरक जरी असला, तरी मुख्य घटकांमध्ये साम्य आढळते. "भिल्ल लोकांच्या रीतिरिवाजाप्रमाणे पाच महिन्यानंतर गर्भपात केल्यास तो गुन्हा समजण्यात येतो. गरोदरपणी आईच्या पोटात बरीच हालचाल होत असेल तर, मुलाचा गर्भ आहे असे समजतात. परंतु, आईला फार त्रास झाला नाही, तर मुलींचा गर्भ असल्याचे समजले जाते. बालकांच्या जन्माच्या वेळी सुईन बाळंत होणाऱ्या स्त्रीची देखभाल करते. बालकाची नाळ बांबूच्या ढलपीने किंवा विळीने कापून

"संस्कृतीच्या अनेक व्याख्या केल्या जातात. संस्कृती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असतांना तिच्यामध्ये प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फरक पडत जातो. कोणतीच संस्कृती ही स्थिर नसते. ती बदलत जाते. या बदलात तिच्यावर चांगला वाईट परिणाम होत असतो. एकतर तिचे संवर्धन होऊन वाढीस लागते किंवा पूर्णतः बदलून जाते. भाषा हा संस्कृतीच्या जडणघडणीतील महत्त्वाचा घटक आहे. भाषेमुळेच संस्कृतीची उत्पत्ती, संवर्धन व संक्रमण होत असते."



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE
Pabal
Tal.Shirur,
Dist.Pune.

ती घराबाहेर खड्ड्यात पुरुन टाकते. तिला दारुची बाटली आणि एक रुपया देण्यात येतो. १२ दिवसाचे बाळंतणीचे सुवेर पाळले जाते. पाचव्या दिवशी पाचवी पुजतात व त्यावेळी बाळाचे नाव ठेवण्यात येते.''[३] सर्वच जमातीमध्ये थोड्याफार प्रमाणात अंधश्रद्धा पाहण्यास मिळते, डागणी सारख्या अघोरी प्रथाही आढळतात, देवा-धर्मावर जास्त विश्वास ठेवतात. स्त्रीच्या जन्माचेही स्वागत करतात, मुलगा-मुलगी असा भेदभाव दिसत नाही. घरगुती उपचारास जास्त महत्त्व देतात. काही जमातीमध्ये डॉक्टरांचीही मदत घेतात. बाळंतपण शक्यतो माहेरीच होते, पाच दिवसांनी विटाळ फिटते, तर बाराव्या दिवशी मुलाचे नाव ठेवले जाते. विळीने, दगडाने, बाळाची नाळ कापली जाते व ती खड्ड्यात किंवा शेणकईत पुरली जाते. नैसर्गिक बाळंतपणावर त्यांचा विश्वास आहे. बाळंतपण सुईणच करते. पाचविला आलेल्या लोकांना भोजन व दारू दिली जाते. विधी थोड्याफार फरकाने वेगळे आहेत, परंतु सर्वच जमाती ते विधी करतात.

### पोशाख

पोशाखाच्या बाबतीत आजही आदिवासी लोकांची खिल्ली उडविली जाते. झाडाची पाने अंगाला गुढाळणारा माणूस म्हणजे आदिवासी. अशी त्याची ओळख असे, त्यांच्यात होणारा बदल आता आपण लक्षात घ्यायला हवा, आज परिस्थिती बदललेली आहे. ''ठाकूर लोकांतील पुरुषांचा पोशाख-नेसायला लंगोटी व अंगात घालायला एक बंडी किंवा कोपरी एवढे असले की, ठाकरा पोशाख होतो. परंतु ठाकूर स्त्रियांचे तसे नाही. ठाकरांच्या स्त्रिया इतर शेतकऱ्यांच्या स्त्रियांपेक्षा वेगळाच पोशाख करतात. त्यामुळे त्या इतरांहून वेगळ्या दिसतात. ठाकूर स्त्रियांची साडी फक्त त्यांच्या कमरेभोवती गुंडाळलेली असते. साडीचा पदर काढणे त्यांना माहीत नाही. 'म' ठाकरांच्या स्त्रिया आपले ऊर झाकण्यापुरत्या चोळ्या वापरतात. पण 'क' ठाकरांच्या स्त्रिया अगदी अलीकडच्या काळापर्यंत चोळीही वापरत नसत.''[४] पुरूषाचा पोशाख धोतर, कुडता, पागोटे, लंगोटी, तर स्त्रिया चोळी घालतात, फडकी गुंडाळतात किंवा पातळ (नऊवारी) नेसतात. हे सर्वच जमातींमध्ये साम्य आढळते. पुरूषांचे लंगोटीचे प्रमाण आता कमी झाले आहे. काही जमातींमध्ये स्त्रियांना दागिण्याची हौस आहे. चांदी, तांब्याचे दागिने त्या वापरतात. काळ्या मण्यांची पोत वगैरे दागिने वापरतात. पारंपरिक दागिण्यावर आदिवासी स्त्रियांची श्रद्धा आहे. पुरूषामध्ये दागिण्यांची फारसी आवड नाही. परंतु चांगला पोशाख घालून, दाग-दागिने घालून प्रस्थापित समाजासारखे मिरविण्याची हौस मात्र आदिवासींमध्ये दिसत नाही. गोंदवून घेण्याची प्रथा आदिवासींमध्ये सर्रास आढळते. काही ठिकाणी मात्र काही जमातींमधील लोक दारिद्र्यामुळे आजही अर्धनग्न पाहायला मिळतात.

### व्यवसाय, उद्योग धंदे, शेती, अन्न

आदिवासीमध्ये ४७ जमाती आहेत. सर्वसाधारणपणे सर्व जमाती शेती, शेतमजुरी व शिकार तसेच वनोपयोगी वस्तूंच्या विक्रीतून आपला उदरनिर्वाह करतात. शेती व शिकार हे सामान्यतः मुख्य व्यवसाय आढळतात. ठराविक काही जमातीकडेच चांगल्या प्रकारची शेती आहे. उदा. ज्वारी, तूर, उडीद, मूग, वाल, बाजरी, मका, हुलगा, खुरासनी, वरई, इ. धान्य पिकवितात. हातमजुरी करणे, जागले, लाकूड तोडणे, बांबू तोडणे, महुची फुले, लाख, डिंक, सरपण गोळा करणे, पोहे कुटणे, जनावरे पाळणे, हिरडा-बेहडा जमा करणे असे व्यवसाय करतात. मासे पकडणे, डुक्कर, ससे, खरगोस, माकडे, उंदीर, घोरपडी यांची शिकार करून मांस खातात. गाईचे मांस वर्ज्य मानतात. मद्यपान मात्र प्रत्येक जमातीमध्ये पाहायला मिळते.

### जातपंचायत

आदिवासी जमातींमध्ये जातपंचायत ही न्यायदानाची वैशिष्ट्येपूर्ण पद्धत आहे. एक म्हण आहे. शहाण्याने कधी कोर्टाची पायरी चढू नये. त्या म्हणीप्रमाणे आजही अनेक ठिकाणी, कोर्ट कचेरीची पायरीही न चढलेले लोक आपल्याला आदिवासी भागात पाहायला मिळतील. त्यांच्यामध्ये जो काही भांडण-तंटा होतो. तो गावातच मिटवला जातो. चावडीवर जातपंचायत भरते. ही भांडणे मिटविण्यासाठी, समझोता करण्यासाठी, सण समारंभ साजरे करण्याचे ठरविण्यासाठी, प्रत्येक जमातीची जात पंचायत असते. त्यांच्या पुढाऱ्याला, नेत्याला 'आंध' जमातीत मुखिया' म्हणतात. त्याला 'म्हेतऱ्या' ही म्हणतात. 'मेहतरिया किंवा मुखिया' न्यायनिवाडा करण्यासाठी गावा-गावात जातो. या प्रमुखांच्या मदतीने जातपंचायतीमध्ये न्यायनिवाडा केला जातो.

### घर

अन्न, वस्त्र, निवारा या माणसाच्या मुख्य तीन गरजा आहेत. त्या शिवाय तो जगू शकणार नाही. त्याला राहण्यासाठी घराची आवश्यकता असते. पूर्वीचे आदिमानव आदिवासी, गुहेमध्ये राहत होते. नंतर त्याला घराची गरज वाटू लागली. आता तो घर करून राहत आहे. प्रत्येक जमातीतील लोकांची घरे त्यांची रचना वेगळी आहे. महादेव कोळ्यांची काही घरे झोपड्यांची आहेत. झोपडीच्या एका भागात माणसे राहतात व दुसऱ्या भागात गुरेढोरे बांधतात. झोपडीच्या भिंती मातीने लिंपलेल्या, कारवीच्या कुडाच्या असतात. छत गवताने अथवा भाताच्या पेंढ्यांनी साकारलेले असते. आता नळीच्या व मंगलोरी कौलाची घरेही या भागातून दिसू लागली आहेत. घराला माळा असतो. त्याचा उपयोग गाडगी-मडकी, इरली, विळा, कोयता, सरपण व गोवऱ्या आणि वैरण ठेवण्यासाठी होतो. पूर्वी लोक चुलीतील विस्तव कायम ठेवत असत. सरपणाकरवीच्या (पान नं. ३१ वर)



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune

(पान नं. १७ वरुन) अभावी आता ही प्रथा बंद झाली आहे. एकूणच आदिवासींची घरे कुडाची, कच्च्या विटांची, चिखलामातीने लिंपलेली असतात. गवताचे किंवा कौलाचे छप्पर असते. माणसांची व जनावरांची एकाच घरात व्यवस्था असते. काही ठिकाणी ती वेगवेगळी दिसते. सरपण वैरण घरातच ठेवतात. घरे छोटीच असतात. दोन दरवाजे असतात परंतु खिडक्या नसतात. आदिवासींच्या घरामध्ये हंडा, तांब्या, पितळी, परात, तवा, गंज, थाळी, वाटी, सूप, गुंडी, बादली, पातेले, तवली, डाव, चाटू, कलथा, काढवट, शिकाळी, कणगी, साठ्या, मलई, थोतड, भोकशी, किरकिंडा, येहंडी, उखळ, दळणासाठी जाते. अशा वस्तू आढळतात. काही जमातीमध्ये अस्वच्छता आढळते. तर, काही सुधारलेल्या जमातीच्या घरामध्ये स्वच्छता, नीटनेटकेपणा आढळतो.

**आदिवासी विवाहपद्धती :** आदिवासी विवाहपद्धती इतर समाजापेक्षा थोडी वेगळी आहे. लग्नातील रीतीरिवाज वेगळे आहेत. प्रत्येक जमातीमध्ये लग्न ठरविण्यापासून लग्नाचे सर्व विधी पार पडेपर्यंतच्या या सर्व विधींना खूप महत्त्व दिले जाते. उदा. ''तडवी भिल्लात लग्नाचा मुहूर्त ब्राह्मणाकडून काढला जातो. निका (लग्न टाळी) काझी लावतो. पूर्वी लग्नाचा सोहळा अनेक दिवस चालत असे. परंतु अलिकडे दळणावळणाच्या सोयी झाल्यामुळे व महागाईमुळे हा सोहळा तीन दिवसांत आटोपतात.''

**अंत्यसंस्कार :** अंत्यसंस्काराच्या वेळी सुद्धा प्रत्येक जमातीच्या प्रथा वेगवेगळ्या आहेत. माणसाच्या मृत्यूनंतर काही जमातींमध्ये जाळण्याची, तर काही जमातींमध्ये पुरण्याची प्रथा आढळते. दशक्रिया विधीचा दिवस तिसरा, दहावा, अकरावा असा सोईनुसार ठेवतात. तितक्या दिवस दुखवटा पाळण्यात येतो. नातेवाईक, सोयरे पागोटे बांधून 'ओला दुखवटा' तर दूरचे लोक रोख रक्कम देऊन 'सुका दुखवटा' करतात. दशक्रियेच्या दिवशी सारा समाज एकत्र येत असल्यामुळे त्याच दिवशी 'जातपंचायत' भरवून सामाजिक न्याय निवाडे केले जातात. काही जमातीमध्ये मृतात्म्याला शांती लाभावी म्हणून दारु पिऊन, नृत्ये केले जाते.

**निष्कर्ष :** या घटकांच्या अनुषंगाने संपूर्ण आदिवासी संस्कृती आणि लोकसाहित्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रातील आदिवासी समाजाची जीवनपद्धती कशी आहे. त्यांची संस्कृती इतरांपेक्षा कशी वेगळी आहे. प्रस्थापित समाजाने त्यांच्याकडून काय शिकण्यासारखं आहे. किंवा आदिवासींनी स्वत:मध्ये काय बदल केला पाहिजे या घटकांचा विचार केला आहे. ■

**संदर्भ** १. कर्वे इरावती, आमची संस्कृती, देशमुख आणि कंपनी(पब्लिशर्स)प्रा.लि.पुणे, पुनर्मुद्रण २०१०. पृ.७ २). तुमराम विनायक, आदिवासी साहित्य: दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती ०१२. पृ.१५ ३). गारे गोविंद, महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉन्टिनेंन्टल प्रकाशन, पुणे. तृतीयावृत्ती २०१२. पृ.५० ४). तत्रैव, पृ.१५३ ५). तत्रैव,पृ.५६

पान नं. १५ वरुन प्रामाणिकपणा आणि पारदर्शकता, ऐक्य या कित्येक गुणांचा अविष्कार विविध प्रकारची आदिवासी गाणी आणि नृत्यांच्या प्रकारातून प्रत्ययाला येते. निसर्गाकडून मिळालेल्या या देणगीमुळे आदिवासी चोरी करीत नाही, भिक मागत नाही, बलात्कार, खुन, मारामाऱ्या या अवगुणांपासून आदिवासी माणूस दूर असतो. आदिवासी आणि निसर्ग हे दोन्हीही सजीव घटक एकमेकांप्रती इतके घट्ट आहेत की दोन्हींच्या या नातेसंबंधातून एक अद्वितिय संस्कृती विकसित झाली, जी सातत्याने मानवी जीवनाला मार्गदर्शन करते. ■

**संदर्भ :** १). भोसले (डॉ) द. ता (२००४) : लोकसंस्कृती : स्वरूप आणि विषेश ; पद्मगंधा प्रकाशन, पुणे. २). संगवे (डॉ) विलास (१९७२) : आदिवासींचे सामाजिक जीवन ; पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पुणे आकाशवाणीवर प्रसारीत दि. २७/१२/२०१७

पान नं. १९ वरुन 'एक घाव, दोन तुकडे' असे डॉ. श्रीवास्तव यांच्या कथेचे वर्णन करता येईल. या कारणाने त्यांच्या कथेचा विस्तार होताना दिसत नाही. तरुण पिढीची जी घाई आहे; ती डॉ. श्रीवास्तव यांच्या कथेत दिसते. कथेची सुरवात केल्यानंतर तिचा शेवट करण्याचीही त्यांना घाई झालेली आहे, असे कथा वाचताना जाणवते. अर्थात, तरुण पिढीची ही रोखठोक, 'फारसा मालमसाला नको; जे आहे ते स्पष्ट सांगा.' प्रवृत्ती असल्याने या पिढीला डॉ. श्रीवास्तव यांच्या कथा निश्चितपणे भावतील.त्यामुळे त्यांची कथा सरळ मार्गाने जाते. घटना प्रसंगातील किंवा व्यक्तिमनातील गुंतागुंत तिच्यात नाही. डॉ. श्रीवास्तव यांनी कथेचा शेवट निश्चित केलेला असल्याने ते थेट घटना प्रसंगाचे वर्णन करून शेवटाला जाऊन भिडतात. त्यामुळे जाणकार, रसिक वाचकाला आपण कथेऐवजी हकिकत वाचत असल्याचे जाणवते व तो कथा लेखनशैलीबाबत अतृप्त राहतो. ■



SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal, Tal.Shirur, Dist.Pune.412403